ISSN 2278-8808
SJIF 2013 = 4.194
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# समाजातील थोर व्यक्तींच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा आढावा घेणा-या शिक्षणशास्त्रातील संशोधनांचा आशय विश्लेषण तंत्राच्या सहाय्याने प्रातिनिधीक अभ्यास

**Usha Ghorpade,** Librarian, Abhinav Education Society's College of Education, Narhe Campus, Pune -46

**Savita Kulkarni, Ph. D.** Asst. Professor Prof. Ramkrishna More Arts, Commerce and Sc. College, Akurdi, Pune 411 044

## Abstract

*भारतातील शैक्षणिक इतिहास पाहता अनेक मोठया व्यक्तींनी शिक्षणासाठी आपले आयुष्य वेचले. यामध्ये म. ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, छ. शाहू महाराज, महर्षी कर्वे, महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर यासारख्या अनेक व्यक्ती होत्या. या व्यक्तिंच्या शैक्षणिक कार्याचा आढावा समाजासाठी मार्गदर्शक ठरलेला आहे. याचा अभ्यास करण्यासाठी पुणे विद्यापीठात उपलब्ध असणा-या एकूण १०० मराठी संशोधनांपैकी ७ संशोधने अभ्यासासाठी घेतली आहेत. या संशोधनांचा अभ्यास संशोधनाची उद्‌दीष्टे, संशोधकाने घेतलेला त्या व्यक्तिच्या शैक्षणिक कार्याचा आढावा आणि निष्कर्ष या गोष्टींवर आधारलेला असून संशोधनातील व्यक्तींच्या शैक्षणिक कार्याचा आढावा या मुद्‌द्यावर जास्त भर देण्यात आलेला आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com 4.194, 2013 SJIF*© SRJIS 2014

## प्रस्तावना

सामाजिक क्षेत्रात आशय विश्लेषणाचे विशेष महत्त्व आहे कारण आशय विश्लेषणाच्या सहाय्याने गुणात्मक तथ्यांचे परिणामात्मक आणि वस्तुनिष्ठ विश्लेषण करणे शक्य होते. विशिष्ट प्रलेखातील समाविष्ट असलेले

विचार म्हणजे आशय होय. प्रलेखातील आशयाचा चिकित्सक अभ्यास म्हणजे आशय विश्लेषण होय. आशय विश्लेषण ही गुणात्मक साहित्याचे विश्लेषण करणारे एक महत्वाचे तंत्र असून विविध कालावधीत आणि विविध विषयांसाठी हे तंत्र वापरले गेले आहे. आशय विश्लेषणाचा संबंध भाषेतील अभिव्यक्ति आणि संचाराच्या साधनाद्वारे प्राप्त तथ्यांच्या आशयाशी आहे. आशय विश्लेषणाचा वापर सामाजिक शास्त्र, संपर्क माध्यमे, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास आणि भाषांच्या अभ्यासामध्ये केला जातो.

**व्याख्या** - बनार्ड बेरेल्सन यांच्या मते संज्ञापनातील व्यक्त किंवा प्रकट आशयाच्या वस्तूनिष्ठ, व्यवस्थित व संख्यात्मक वर्णनाचे आशय विश्लेषण हे एक तंत्र आहे. तर पॉलिन यंग यांच्या मते आशयाचे क्रमबध्द, वस्तुनिष्ठ परिणामात्मक वर्णन करण्याचा प्रयत्न आशय विश्लेषण तंत्राद्वारे केला जातो.

अलिकडील काळात राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आशय विश्लेषणाचे तंत्र वापरलेले दिसते. जागतिक स्तरावर विचार करता विविध देशांमध्ये हे तंत्र वापरून केलेले अनेक अभ्यास उपलब्ध आहेत. भारतातही अलिकडील काळात आशय विश्लेषणाचे तंत्र वापरून अनेक प्रकारचे अभ्यास केले गेलेले आहेत.

बी टी संपथ कुमार, के आर पृथ्वी राज, ए सदाशिव नाईक आणि राघवेंद्र रेडडी यांनी पॉंडीचरी विद्यापीठात आयोजित ७ व्या आंतरराष्ट्रीय कॅलीबर २००६ मध्ये सादर केलेल्या Content Analysis of Indian Institute of Management Library Websites: An Analytical Study या शोधनिबंधात भारतातील ६ व्यवस्थापन संस्थांच्या ग्रंथालयातील संकेतस्थळांचे विश्लेषण करून त्यांच्या कडून पुरविल्या जाणा-या सुविधांचे विश्लेषण केले. या लेखकांनी काढलेल्या निष्कर्षावरून असे दिसते की या वेबसाईटवरील माहिती परिपूर्ण नसते आणि काळानुसार त्यांच्यात बदल केला जात नाही. भारतीय व्यवस्थापन संस्थांच्या वेबसाईटचे मूल्यमापन करणे, या संस्थाकडून पुरविल्या जाणा-या सुविधांची माहिती घेणे, या वेबसाईटचे विविध मूल्यांच्या आधारे मूल्यमापन करणे, त्यावरील ग्राफीक्स, ॲनिमेशन आणि त्यांचा संबंध अभ्यासणे अशा विविध उदद्दींष्टांच्या आधारे वरील अभ्यास केला गेला.

विजयकुमार एम. बी.यु. कन्नाप्पनावर आणि ममता मेस्त्री यांनी *DESIDOC Journal of Library & Information Technology* (*DJLIT*) 2009 मध्ये या संशोधनपर जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या Content Analysis of Indian Institutes of Technology Libraries Web Portals: A Study या शोधनिबंधात भारतातील ७ आयआयटी संस्थांच्या वेब पोर्टलचे विश्लेषण केले आहे. आयआयटी सारख्या महत्त्वाच्या संस्थांसाठी लायब्ररी पोर्टल अत्यंत महत्त्वाचे असून या सात ठिकाणी असणा-या संस्थांच्या वेब पोर्टलचा

अभ्यास या शोधनिबंधात केला गेला. या अभ्यासावरून असे निष्कर्ष काढण्यात आले की या संस्थांचे वेब पोर्टल विविध मुद्‌दयांच्या आधारे एकमेकांपासून वेगळे आहेत. आयआयटी ही जगन्मान्य संस्था असून यामध्ये एकजिनसीपणा असणे गरजेचे आहे. या संस्थेचे एक वैशिष्टयपूर्ण वेब पोर्टल असावे असा निष्कर्ष या अभ्यासाद्वारे मांडण्यात आला.

श्रीजीत मिश्रा, संगिता श्रॉफ, दीपक शाह, विवके देशपांडे, अंजली कुलकर्णी, विनायक देशपांडे आणि पी. आर. भटकुले यांनी इंदिरा गांधी विकास संशोधन संस्था मुंबई या ठिकाणी केलेल्या अभ्यासावरून महाराष्ट्रातील शेतक-यांच्या आत्महत्येच्या या विषयावर महाराष्ट्र सरकाला २६ जानेवारी २००६ ला सादर केलेल्या विविध अहवालामध्ये  श्रीजीत मिश्रा यांनी या विषयावर प्रसारमाध्यमांच्या अहवालाचे आशय विश्लेषण केले आहे. हा शोधनिबंध तीन भागात विभागला असून पहिल्या भागामध्ये २००४ मध्ये ३२० विविध शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात देशोन्नती या मराठी दैनिकात प्रसिध्द झालेल्या १६२ बातम्यांचे अहवालांचे विश्लेषणाचा अंतर्भाव आहे.

**भारतातील शिक्षण पध्दती**

प्राचीन भारतीय शिक्षणाची परंपरा उज्ज्वल आहे. आर्यांचे वैदिक वाडगय, आर्याची महाकाव्ये पुराणे, अभिजात वाडगय, शास्त्रीय कलात्मक वाडमय, समाज़ऋण, व व्यावसायिक निती, सघन अभ्यासक्रम, व सयुक्तिक अध्यापन पध्दती ही परंपरा टिकविण्याचे कार्य पाठशाळा, आश्रम, विहार, मठ या संस्थांमध्ये होत असे. पुढे ब्रिटीश राजवट झाल्यानंतर इंग्रजी माध्यमातून शिक्षण सुरू झाले. व नविन विषय अभ्यासक्रमात समाविष्ट झाले. इंग्रजी विदेशी भाषा, नविन पाश्चात्य शास्त्रे, नविन शैक्षणिक विचार रूजू लागले. त्यानंतर सुरू झालेली शिक्षणाची प्रशिक्षणे, १६०४ चा शासन निर्णय, शिक्षण आयोग यामुळे भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये अनेक सकारात्मक बदल होत गेले. तरीही आजच्या शिक्षण पध्दतीमध्ये अनेक त्रुटी असून त्यांचे परिमाण समाजासमोर येत आहेत. भारतातील शैक्षणिक इतिहास पाहता अनेक मोठया व्यक्तींनी शिक्षणासाठी आपले आयुष्य वेचले. यामध्ये म. ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, छ. शाहू महाराज, महर्षी कर्वे, महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर यासारख्या अनेक व्यक्ती होत्या. या व्यक्तिंच्या शैक्षणिक कार्याचा आढावा समाजासाठी मार्गदर्शक ठरलेला आहे.

**उद्‌देश**

समाजामधील व्यक्तींच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतल्यास त्यांनी मांडलेले विचार आणि सूचना आजही अत्यंत उपयोगी ठरतात. या थोर व्यक्तींच्या चरित्रांचा अभ्यास आजच्या शिक्षण पध्दतीतील त्रुटी भरून काढण्यासाठी होईल या उद्‌देशाने शैक्षणिक कार्याचा आढावा घेतलेल्या ६ पीएचडी संशोधनाचा अभ्यास आशय विश्लेषण तंत्राचा वापर करून केला.

**उद्‌दीष्टे**

वरील उद्‌देश पूर्ण करण्यासाठी खालील उद्‌दीष्टांच्या आधारे अभ्यास केला गेला.

१. पीएचडी संशोधनातील थोर व्यक्तींच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे

२. या शैक्षणिक कार्याचा आजच्या शिक्षणपध्दतीस होणारा उपयोग अभ्यासणे

**अभ्यास पध्दती**

पुणे विद्यापीठात उपलब्ध असणा-या एकूण १०० मराठी संशोधनांपैकी अशा ७ संशोधने अभ्यासासाठी घेतली आहेत. या संशोधनांचा अभ्यास संशोधनाची उद्‌दीष्टे, संशोधकाने घेतलेला त्या व्यक्तिच्या शैक्षणिक कार्याचा आढावा आणि निष्कर्ष या गोष्टींवर आधारलेला असून संशोधनातील व्यक्तींच्या शैक्षणिक कार्याचा आढावा या मुदद्‌यावर जास्त भर देण्यात आलेला आहे.

**विश्लेषण**

अभ्यासासाठी घेतलेल्या संशोधनातून अभ्यासलेली थोर व्यक्तिमत्त्वे ही महाराष्ट्रातील विशेषतः पुणे शहर आणि परिसरातील आहेत. कालावधीचा विचार करता यामध्ये महात्मा फुलेंपासून आण्णा हजारेंपर्यंत व्यक्तींचा समावेश आहे. या संशोधनामध्ये अभ्यासासाठी घेतलेल्या व्यक्ती शैक्षणिक व सामाजिक कार्य करणा-या असून त्यांनी मांडलेले विचार समाजासाठी मार्गदर्शक ठरले.

**संशोधनाची उद्‌दीष्टे**

| संशोधन क्रमांक | संशोधनाचा विषय | संशोधकाचे नाव | एकूण उद्‌दीष्ट | शैक्षणिक कार्याचा आढावा घेणारे उद्‌दीष्ट आहे किंवा नाही |
|---|---|---|---|---|
| १ | पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या शैक्षणिक विचारांचा समाजावर झालेल्या प्रभावांचा अभ्यास | श्री. गागरे शं. बा | ४ | होय |
| २ | कै. गुरूवर्य विष्णू गोविंद उर्फ अण्णासाहेब विजापूरकर यांचे शैक्षणिक कार्य व शैक्षणिक विचारांचा चिकित्सक अभ्यास | श्रीमती अपर्णा राइरीकर | २ | होय |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | गुरूवर्य बाबुरावजी जगताप यांनी शालेय माध्यमिक स्तरावर केलेल्या कार्याचा आढावा | तनपुरे निलिमा | ३ | होय |
| ४ | महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक विचार,योगदान आणि आजच्या शिक्षणासाठी त्यांची उपयुक्तता यांचा अभ्यास | श्री पवार चंदन | ६ | होय |
| ५ | श्रीमती शांताबाई दाणी यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा | गीता कांबळे | ६ | होय |
| ६ | अण्णा हजारे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याचा राळेगण सिध्दीच्या संदर्भात समाजावर पडलेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास | पारधे शर्मिला | | होय |

सर्व संशोधनांची उद्दीष्टे लक्षात घेतली तर संशोधनासाठी निवडलेल्या व्यक्तिच्या सामाजिक व शैक्षणिक विषयक विचारांचा आढावा घेणे हे महत्त्वाचे उद्दीष्ट संशोधकांचे आहे. स्वाध्याय परिवाराचे प्रणेते आणि संस्थापक पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या कार्याचा अभ्यास करताना श्री. गागरे शं. बा यांनी चार उद्दीष्टे मांडली असून पांडुरंगशास्त्री आठवले यांचे जीवन कार्य आणि त्यांनी विविध माध्यमातून प्रस्तूत केलेले विचार समाजप्रबोधनासाठी आणि सुसंस्कृत माणूस घडविण्यासाठी कारणीभूत झालेली आहेत असे गृहीतक मांडले आहे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या चरित्राचा अभ्यास करताना श्री. राम आबणे यांनी एकूण ७ उद्दीष्टे मांडली असून त्यापैकी पहिले उद्दीष्ट अण्णाभाऊ साठे यांच्या चरित्राचा शिक्षण विषयक विचार करणे असे आहे. या संशोधनासाठी मांडलेली परिकल्पना अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात शिक्षण विचारातील अनेक घटक व्यक्त झाले असून या घटकांमुळे शिक्षण विचारांच्या क्षेत्रात मोलाची भर पडेल अशी आहे. श्रीमती अपर्णा राइरीकर यांनीही गुरूवर्य विष्णू गोविंद उर्फ अण्णसाहेब विजापूरकर यांच्या शैक्षणिक कार्याचा सर्वांगिण अभ्यास करणे व त्यांच्या शैक्षणिक विचारांचा चिकित्सक अभ्यास करणे अशी दोन उद्दीष्ट मांडली आहेत. गुरूवर्य बाबुरावजी जगताप यांच्या चरित्राचा अभ्यास करताना तीन उद्दीष्टे मांडली असून यात शालेय स्तरावरील मूल्य शिक्षणाच्या संदर्भात केलेल्या कार्याचा आढावा घेणे हे महत्त्वाचे उद्दीष्ट मांडले आहे. श्रीमती शांताबाई दाणी यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेताना गीता कांबळे यांनी ६ उद्दीष्टे समोर ठेवून शांताबाई दाणी यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा हे महत्त्वाचे उद्दीष्ट मांडले आहे. श्री पवार चंदन यांनी महात्मा ज्योतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या जीवनचरित्राचा अभ्यास करताना ६ उद्दीष्टे मांडली असून त्यापैकी सर्व शैक्षणिक विचार व कार्याचा अभ्यास करणे तसेच त्यांच्या शिक्षणविषयक कार्यामुळे झालेला शैक्षणिक विकास व सामाजिक परिवर्तन यांचा शोध घेणे तसेच त्यांच्या कार्याची आजच्या काळातील उपयुक्तता अभ्यासणे अशी आहेत.

**शैक्षणिक कार्याचा आढावा**

अभ्यासासाठी घेतलेल्या सर्व थोर व्यक्तींच्या शैक्षणिक कार्याचा आढावा या संशोधनांद्वारे घेतला गेला आहे. या सर्व व्यक्तींचे शिक्षणाविषयीचे विचार काळाला अनुसरून होते आणि आजही ते उपयुक्त आहे. आजच्या मुलांचे अभ्यासावरील कमी झालेले लक्ष, टीव्ही आणि इतर माध्यमांचा त्यांच्यावर पडलेला प्रभाव, अध्ययन आणि अध्यापन पध्दती या सारख्या अनेक गोष्टींवर या व्यक्तिंच्या कार्यातून प्रभाव पडलेला दिसतो. या व्यक्तींची शिक्षणाविषयीची तळमळ त्यांच्या विचारातून आणि वर्तनातून दिसते. यामध्ये काही व्यक्ती शालेय सुविधा उपलब्ध करून, तर कुणी शिक्षणाविषयीचे विचार मांडून आपली तळमळ व्यक्त करताना दिसतात.

स्वाध्याय परिवाराचे प्रणेते पांडुरंगशास्त्री यांनी मूल्यशिक्षणावर भर दिला आणि अध्ययनाच्या पध्दती कशा असाव्यात हे त्यांच्या स्वाध्यायांच्या रूपाने दाखवून दिले. त्यांच्या सहवासात येणा-या प्रत्येकाच्या गुणांवर भर देऊन त्यांना प्रेरित केले. पांडुरंगशास्त्रींनी स्वतःची अशी शिक्षणपध्दती उभी केली की नोकरीची गरजच भासणार नाही. स्वतःचा व्यवसाय उमेदीने चालविणारा विद्यार्थी त्यांनी घडविला. मुलांचे अभ्यासावर लक्ष केंद्रित व्हावे पाठांतर वाढावे यासाठी मुलांसाठी बालसंस्कार वर्गाचे आयोजन करतात. १३ तालुक्यांमधील त्यांची बालसंस्कार केंद्रे, १० तालुक्यातील २२ युवाकेंद्रे आणि पदवीधर बुध्दीमान तरूणांची संघटना यांचे आयोजन पांडुरंगशास्त्रींची शिक्षणातील दूरदृष्टी दर्शवितात आणि आजच्या शिक्षणपध्दतीत काय असायला हवे हे उदाहरणाने स्पष्ट करतात.

गुरूवर्य विष्णू गोविंद उर्फ अण्णासाहेब विजापूरकर यांच्या चरित्राचा अभ्यास केल्यावर संशोधकाला त्यांच्या विचारातून आणि चरित्रातून शिक्षणातील सखोल विचार आढळतात. गुरूवर्य बाबुरावजी जगताप यांनी एक शिक्षक व समाजसुधारक या दुहेरी भूमिकांमधून विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व समाज घटकांना मार्गदर्शन केलेले आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात व्यक्त झालेली धोरणे त्यांच्या शैक्षणिक विचारांमध्ये प्रतिबिंबित झालेली दिसतात. त्यांनी आपले आचार आणि विचार यांच्या माध्यमातून वैचारिक मूल्यांचा पाठपुराव करून बहुजन समाजातील बालकांचा विकास केला. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी अनेक शालोपयोगी उपक्रम केले. शिक्षकांना प्रेरणा निर्माण करण्याचे काम केले. शिक्षक हे मासिक चालवून शिक्षकांनी आपली गुणवत्ता वाढवून समाजातील दुर्बल घटकांच्या प्रगतीसाठी कशाप्रकारे प्रयत्न करावेत हे स्पष्ट केले. शिक्षकांच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यावर जाहीर चर्चा करून उपाययोजना सांगितल्या. त्यांच्या अनेक व्याख्यानांमधून त्यांनी शिक्षकांना गुणवत्ता वाढ, सामाजिक बांधिलकीची निर्मिती शिक्षक पेशावरील जबाबदारी यांविषयी शिक्षकांना मार्गदर्शन केले.

श्रीमती शांताबाई दाणी यांचे व्यक्तिमत्वच त्यांची शिक्षणाविषयीची तळमळ सांगून जाते असे या संशोधकाने म्हणले आहे. शिक्षणविषयक सुविधा मुलांना देऊन त्यांनी त्यांची शिक्षणविषयक तळमळ, सामाजिक प्रगतीची ओढ, शिक्षणातून सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी केलेले प्रयत्न दाखवून दिले. त्यांनी आपल्या आयुष्यभराच्या कारकिर्दीत ज्ञानविकास केंद्रांची स्थापना केली. विद्यार्थ्यांसाठी रमाबाई आंबेडकर वसतिगृहाची स्थापना, रमाबाई आंबेडकर कन्या विद्यालय, तक्षशिला विद्यालय, कुणाल प्राथमिक शाळा, बालवाडयांची स्थापना यासारख्या शैक्षणिक संस्थांची स्थापना केली आणि यातूनच मुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण दिले. शिक्षणात लोकशाही पध्दत रूजविली. मुलांना शैक्षणिक सुविधा पुरविण्यासाठी झोळी घेउन वर्गणी काढली.

अण्णा हजारे यांनी सामाजिक कार्य करता करताच शिक्षणाची वेगळी दृष्टी निर्माण केली. नापासांची शाळा हा त्यांचा एक अभिनव प्रयोग होता. त्यांनी राळेगण सिध्दी येथे काढलेल्या या शाळेत नापासांना प्रवेश दिला जातो. नापास विद्यार्थ्यांच्या मनातील न्यूनगंड काढून टाकण्यासाठी जाणिवपूर्वक केलेला हा प्रयत्न होता. ग्रामसभेमध्ये इतर विषयांबरोबरच शालेय कामकाजाचा आढावा घेण्याची पध्दत आण्णांनी सुरू केली. शाळेमध्ये स्वयंशिस्त असावी, वेळेच नियोजन, कृतीशिलता आणि अभिरूचीला प्राधान्य दिले जावे या विचारांनी त्यांनी शाळा चालवली.

महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समाजाला वेगळी दृष्टी दिली आणि शैक्षणिक सुविधाही उपलब्ध करून दिल्या. त्यांचे कार्य म्हणजे शैक्षणिक क्षेत्रातील परिवर्तनच होय. संशोधकाने या संशोधनामध्ये म. फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक विचार व कार्याने झालेले सामाजिक परिवर्तन मांडले आहे. फुले दांपत्याच्या विचारांनी राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाउराव पाटील, विठठल रामजी शिंदे, महर्षी धोंडो केशव कर्वे, बाबासाहेब आंबेडकर, ताराबाई मोडक, अनुताई वाघ पंडीता रमाबाई, आनंदी जोशी हे प्रभावित झाले आणि त्यांनी शिक्षण प्रसाराचे काम सुरू ठेविले. फुले दांपत्याचे विचार व कार्य यामुळे समाजात जाणिव जागृती झाली. बहुजन समाजात शिक्षणप्रसार झाला. रंगभेद व वर्णभेद दूर करण्यासाठी शिक्षण उपयोगी पडेल हे त्यांचे विचार लागू पडले. शिक्षणाची सक्ती केल्याशिवाया शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करता येणार नाही असे मत त्यांनी मांडले होते. शिक्षणामुळे माणसाचे मन सुदृढ होते. माणसाच्या दृष्टीकोनात बदल होते ही मते त्यांनी त्या काळी मांडली. त्यांनी शिक्षणपध्दतीवर अनेक मते मांडली आणि त्यांच्या विचारांची आजही उपयुक्तता आपल्याला पटते. गरिबांना शिक्षण ही योजना त्यांनी त्या काळी मांडली होती जी आजही राबविली जाते. वंचितांसाठी शाळा, गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी योजना, नैतिक व मूल्य शिक्षणाची गरज,

मातृभाषेबरोबरच इंग्रजीचे शिक्षण, अंधश्रध्दा कमी करण्यासाठी शिक्षणाची गरज ही त्यांची धोरणे आजही उपयुक्त असल्याचे दिसते.

**निष्कर्ष**

संशोधकांनी मांडलेल्या निष्कर्षातून असे लक्षात येते की, जवळजवळ सर्व संशोधकांनी या व्यक्तिंच्या कार्याचा समाजपरिवर्तनासाठी परिमाण होतो असा निष्कर्ष काढलेला आहे. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची सद्यस्थितीतील उपयुक्तताही श्री चंदन पवार यांनी दिली आहे.

**समारोप**

वरिल संशोधनातून असे स्पष्ट होते की थोर व्यक्तिंचे विचार आणि कार्य समाजासाठी प्रेरणादायी असून मार्गदर्शक ठरते. वर अभ्यासल्या गेलेल्या व्यक्तिंचे शैक्षणिक कार्य मोठे असून त्यांचे विचार आजच्या शैक्षणिक समस्यां सोडविण्यासाठी उपयुक्त ठरतात. यामध्ये पांडुरंगशास्त्री आठवले यांचे स्वाध्याय सारखे उपक्रम असोत की जे लहान मुले आणि युवकांसाठी काम करतात किंवा महात्मा फुलेंनी काढलेल्या वंचितांसाठीच्या शाळा असोत. या सर्वांच्या चरित्रातून शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने बोध होतो आणि मार्गदर्शन मिळते.

## संदर्भसूची

Krippendorff, K. (1980). Content Analysis: An introduction to its methodology,London: Sage
Annual Status of Education Report (Rural) 2012, (New Delhi: ASER Centre, 2013).

Devi Prasad, B. (1994). Dowry-related violence: A content analysis of news in selected papers, The Journal of Comparative Family Studies, 25(1): 71-89

Devi Prasad, B., Visweswara Rao, K., & Sampat Kumar, R.D. (1992). Civic concerns in an emerging city and its adjoining regions: A content analytic study of critical letters to the “Action Please” column in Indian Express, NAGARLOK, 24(2): 32-42

Murty, D.V.R. (2001). Developmental Journalism, New Delhi: Dominant Publisher.